आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा !
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप !

शिल्पकार विकासाचा...
देशदूत

पान २
पडसाद : खिशात नाही आणा अन्...

शेवटचे पान
ठाकरे स्मारक महापौर बंगल्यातच

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २९५ । बुधवार, दि. २ जुलै २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

संपादकीय
फक्त हक्क पुरेसा नाही

शिक्षण हक्क कायद्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील मुलांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला. त्यांचा तो मूलभूत अधिकार ठरवला. सरकारी शाळांत मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जाणे या कायद्यानुसार अपेक्षित आहे. ते शिक्षण सरकार देतेच. पोषण आहारही पुरवते. तथापि तेवढे पुरेसे नाही. त्याबरोबर शाळेतील शिक्षणाचा दर्जा आणि अत्यावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करणे हीदेखील सरकारची जबाबदारी आहे. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा येथील केलखाडी पाड्यावरील मुलांचे जीवावर उदार होऊन शाळेला जातानाचे एक सचित्र वृत्त प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले. परिसरातून एक नदी वाहते. त्या नदीवर पूल नाही. त्यामुळे पाड्यावरील मुले झाडाच्या फांदीवरून दोराच्या साहाय्याने नदी ओलांडून शाळेत जातात. विविध वयोगटातील वीस मुले दररोज ही कसरत करतात. केवळ शिक्षण आणि आहार फुकट मिळतो म्हणून मुलांनी त्यांचा जीव धोक्यात घालावा, अशी सरकारची अपेक्षा आहे का? दुर्गम आणि अतिदुर्गम भागातील बहुतेक गाव-पाड्यांतील अवस्था थोड्या फार फरकाने अशीच असू शकेल. रस्ते धड नाहीत. शाळेची इमारत पडकी आणि वर्ग गळके असतात. सरकारी शाळांतील स्वच्छतागृहांची सोय, त्यांची स्वच्छता आणि देखभाल हा स्वतंत्र चर्चेचा विषय होऊ शकेल. त्यावरून न्यायालयाने सरकारचे अनेकदा वाभाडे काढले आहेत. शाळांसंबंधातील असे लहान-सहान मुद्दे न्यायसंस्थेला धसास लावावे लागत असतील तर सरकार काय करते? असा प्रश्नही विचारला आहे. मासिक धर्माच्या काळात मुलींची परिस्थिती त्यामुळे अधिकच बिकट बनते. शैक्षणिक दर्जाही वादाच्या भोवऱ्यात सापडतो. 'असर' च्या अहवालावर अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर टीका-टिप्पणी केली जाते. तथापि तो अहवाल सरकारी शाळांमधील शैक्षणिक दर्जावर झगझगीत प्रकाश टाकतो. त्यातील निष्कर्ष नकारात्मक असतात याला काही शाळा अपवादही असतील. सर्जनशील शिक्षक त्यांची शाळा आदर्श बनवण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. अशा शिक्षकांचा परिचय करोनाकाळाने समाजाला करून दिला होता, पण असे शिक्षक अपवाद आहेत. माध्यमांत बातम्या आल्या म्हणून मग आता मंत्री व राजकीय नेते केलखाडी परिसराला कदाचित भेट देतील. या पाड्यावरील नदीवर पादचारी लोखंडी पूल बांधण्यासाठी चाचपणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याची बातमी त्यानंतर आली आहे. जादूची कांडी फिरली तर पूल बांधलाही जाईल कदाचित, पण ते फक्त केलखाडी

पान १० वर

तापमान

किमान	:	२२.४°
कमाल	:	२७.२°

आरकेवरील ५७ वर्षांची यशवंत मंडई इतिहासजमा

नाशिक । प्रतिनिधी

शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या रविवार कारंजा येथील तब्बल ५७ वर्षे जुनी असलेली यशवंत मंडई इतिहासजमा होणार आहे. जीर्ण आणि धोकेदायक झाल्याने इमारतीच्या पाडकामाला कालपासून सुरुवात करण्यात आली. एक महिना हे पाडकाम चालणार आहे.

यशवंत मंडई ही वास्तू रविवार कारंजा येथे १९६८ साली उभारण्यात आली होती. मात्र ती जीर्ण झाल्याने अत्यंत धोकेदायक बनली होती. म्हणून महापालिका प्रशासनाने तातडीने लक्ष घालत यशवंत मंडई पाडण्याची प्रक्रिया सुरू केली. या ठिकाणी इमारत पाडून बहुमजली पार्किंग उभारण्याची मागणी स्व. सुरेखाताई भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष व शिवसेना पदाधिकारी सचिन भोसले यांनी केली होती. यशवंत मंडई पाडण्याच्या महापालिकेच्या निर्णयाला विरोध करत काही व्यावसायिकांनी थेट उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते, मात्र तेथे त्यांचा काहीएक उपयोग झाला नाही. दोनदा इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट केले असता त्यात इमारत धोकेदायक व जीर्ण झाल्याने कधीही कोसळेल, असा निष्कर्ष देण्यात आला होता. बांधकाम विभागाने कार्यारंभ आदेश देताच एस. सी रॉड्रिक्स संस्थेने आजपासून इमारत तोडण्याचे काम सुरू केले आहे.

धोकादायक इमारत पाडण्यास सुरुवात

सद्यस्थितीत कुठल्याही मशीनचा वापर न करता काम गारांद्वारे ती पाडण्यात येणार आहे. साधारणत: यशवंत मंडई पाडण्यासाठी महिनाभराचा अवधी लागणार आहे. यशवंत मंडई जमीनदोस्त करून येथे मनपातर्फे बहुमजली पार्किंग अथवा व्यापारी संकुल उभारले जाणार आहे. रविवार कारंजा हा मध्यवर्ती व वर्दळीचा परिसर आहे. शहराची मुख्य बाजारपेठ असल्याने नेहमी गजबज असते. इमारत खाली केल्यानंतर पुढे पाडताना आजूबाजूची दुकाने, वाडे, रस्ता यांना कोणतीही हानी होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार आहे.

> रविवार पेठ नाशिकचे नाक असून मध्यवर्ती ठिकाणच्या भागात पार्किंगची व्यवस्था नसल्याने ग्राहक रविवार पेठ, मेनरोड, कापड बाजार आदीसह आजूबाजूंच्या व्यावसायिकांकडे पाठ फिरवत असल्याचे चित्र होते. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने ही इमारत धोकेदायक बनली असल्याने ती केव्हाही कोसळण्याची भीती होती. मात्र आता ही इमारत पाडून बहुमजली पार्किंग उभारली जाणार असल्याने नागरिकांच्या सुरक्षेसह व्यावसायिकांना फायदा होइल.
>
> – सचिन भोसले, शिवसेना, पदाधिकारी

व्यापारी, ग्राहकांच्या सेवेतील यशवंत मंडईची पाच दशके (पान १० वर)

विधानसभेत रणकंदन
आक्रमक नाना पटोले दिवसभरासाठी निलंबित

- शेतकरी अवमानवरून कोकाटे, लोणीकर यांच्यावर कारवाईची मागणी
- निलंबनानंतर विरोधकांचा कामकाजावर बहिष्कार

मुंबई । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करणारे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजप आमदार बबनराव यादव लोणीकर यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस आमदार नाना पटोले मंगळवारी विधानसभेत आक्रमक झाले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनापर्यंत धाव घेत पटोले यांनी अध्यक्षांच्या समोरील राजदंडाला स्पर्श केला. यावेळी विधानसभेत गदारोळ झाला. समज देऊनही पटोले ऐकत नसल्याने शेवटी नार्वेकर यांनी त्यांच्यावर दिवसभरासाठी निलंबनाची कारवाई केली. या कारवाईच्या निषेधार्थ विरोधी पक्षाने कामकाजावर बहिष्कार टाकला.

विधासभेत प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर नाना पटोले यांनी शून्य प्रहरात माणिकराव कोकाटे आणि पान १० वर

पटोले भूमिकेवर ठाम

राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांना वारंवार समज देण्याचा प्रयत्न केला. राजदंडाला स्पर्श केल्यानंतर काय कारवाई होऊ शकते याचा निर्णय स्वतः पटोले यांनी अध्यक्ष असताना दिला होता. त्यामुळे मला पुढील कारवाई करण्यासाठी मजबूर करू नका, असा इशारा नार्वेकर यांनी दिला. मात्र, त्यानंतरही पटोले आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने नार्वेकर यांनी त्यांच्यावर दिवसभरासाठी निलंबनाची कारवाई केली. त्यामुळे संतप्त झालेल्या विरोधी पक्षाने या कारवाईचा निषेध नोंदवत विधानसभेच्या दिवसभराच्या कामकाजावर बहिष्कार घातला.

रवींद्र चव्हाण भाजपचे प्रदेशाध्यक्ष

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला नवीन प्रदेशाध्यक्ष मिळाला असून रवींद्र चव्हाण यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांच्यासह प्रमुख भाजप नेते उपस्थित होते. चव्हाण हे भाजपचे नावाने बारावे अध्यक्ष असतील.

वरळी डोम येथे पार पडलेल्या पक्षाच्या राज्य परिषदेच्या अधिवेशनात रवींद्र चव्हाण यांनी मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारली.

भारतीय जनता पक्षाची राष्ट्रवादाची विचारधारा तसेच मोदी पान १० वर

राज्यात ३६ उपजिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्या

नाशिक । प्रतिनिधी

राज्यातील ३६ उपजिल्हाधिकारी स्तरावरील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. नाशिकचे निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी कोकण भवनमधील भूमी परिमार्जन विभागाचे विशेष कार्यकारी अधिकारी रोहितकुमार राजपूत यांची नियुक्ती झाली आहे.

राजेंद्र वाघ यांची बदली उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक-२ या पदावर झाली आहे. निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी शशिकांत मंगरुळे यांची बदली उपविभागीय अधिकारी निफाड म्हणून तर धुळे येथील उपजिल्हाधिकारी सीमा अहिरे यांची बदली नाशिक येथे रोजगार हमी योजनेच्या पदावर झाली आहे.